दि. दा. क्र.**३४८/२०२३**
अशोक गंगाराम चिलमे
वि. हरिश्चंद्र गंगाराम चिलमे
नि.क्र. १०७

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांचा उर्वरीत उलटतपास वादीतर्फे विद्वान वकील श्री. ए. एम. निंबुरगे यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरुः–</u>**

२१. हक्कसोड पत्र करून दिल्यानंतर मी फेरफारसाठी अर्ज केला होता. फेरफारच्या अनुषंगाने वादी व मयत प्रतिवादी क्र. २ यांना नोटीस काढण्यात आली नव्हती. फेरफारवर नोटीस न काढता नाव लावण्यात आले होते. फेरफार मंजूर करण्यापुर्वी संबंधीतांना नोटीस काढण्यात येतात याची माहिती मला नव्हती. फेरफार घेण्यापुर्वी तलाठी यांनी वादीची किंवा मयत प्रतिवादी क्र. २ यांची सही घेतली नाही. तलाठी यांनी फेरफारच्या अनुषंगाने पंचनामा केला किंवा नाही हे मला आता आठवत नाही.

२२. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ६ मधील मजकूर, ''हे म्हणणे खरे नाही की, सदर दस्तातील मजकूर पाहिला असता त्यात कोणत्या बाजुच्या क्षेत्राचे हक्कसोड पत्र वादीने, प्रतिवादी क्र. २ सोबत प्रतिवादी क्र. १ च्या हक्कात करून दिले याचा कसलाही उल्लेख नाही''. हा मजकूर माझ्या वकिलांना सांगण्यापुर्वी मी हक्कसोड पत्र (नि.क्र.८८) वाचून पाहिले होते का? हक्कसोड पत्र (नि.क्र.८८) मध्ये चतु:सिमा नोंदवलेल्या आहेत. वादी यांनी त्यांच्या पत्नीच्या हक्कात करून दिलेले बक्षीस पत्र मी वाचले आहे. सदर बक्षीस पत्रामध्ये त्यांनी काय चतु:सिमा दाखवल्या आहेत हे मला सांगता येणार नाही. मी माझ्या सरतपासाच्या शपथपत्रामधील परिच्छेद क्र. ७ मध्ये ''हे म्हणणे खरे नाही की, वादीने आपला वडीलोपार्जीत हिस्सा कायम ठेवुन मी विक्री केलेला हिस्सा नोंदणीकृत बक्षीस पत्र अ.क्र.३१३४ दि.१३/०९/२०१७ आधारे पत्नीस दिला आहे'' असे मी माझी जमिन पुर्वेकडे आहे म्हणुन मी सांगत आहे. वादीने त्याच्या वडीलांनी वाटुन दिलेली जमिन बक्षीस पत्राने त्याच्या पत्नीस दिली आहे.

२३. हक्कसोड पत्र (नि.क्र.८८) च्या फेरफार संदर्भात तहसीलदार किंवा उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, उपविभागीय अधिकारी, लातूर यांनी हक्कसोड पत्र (नि.क्र.८८) संदर्भात सन २०२२ मध्ये जैसे थे आदेश केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे श्री पांडे वकिलच केस चालवत होते. माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क. ६ मध्ये असे नमुद केले आहे की, ''हे म्हणणे खरे नाही की, वादी नोंदणीकृत खरेदीखताअधारे सन २००२ मध्ये माझ्याकडून योग्य तो मोबदला घेऊन जमिन खरेदी घेतलेली आहे'' या संदर्भात माझ्या तोंडी पुराव्याशिवाय दुसरा कोणताही पुरावा आहे किंवा नाही हे मला आता आठवत नाही. दाव्याच्या परिच्छेद क्र. ७ मध्ये काय मजकूर नमुद केला आहे हे मला आठवत नाही.

२४. वादीने माझ्या विरूध्द मा. उच्च न्यायालयात भूसंपादनाचे पैसे मला देण्यात येऊ नये असे प्रकरण दाखल केले होते किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मा. उच्च न्यायालयामध्ये आदेश झाला होता त्या विरोधात मी मा. सर्वोच्च न्यायालयात गेलो होतो. मा. सर्वोच्च न्यायालयाने औसा येथील कोर्टात केस चालवा म्हणुन आदेश पारित केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मा. सर्वोच्च न्यायालयाने भूसंपादनाच्या नुकसान भरपाईचे पैसे न्यायालयात भरा असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, वादींना भूसंपादनाचे नुकसान भरपाईचे पैसे मिळु नये म्हणुन मी मा. सर्वोच्च न्यायालयाने भूसंपादनाच्या नुकसान भरपाईचे पैसे न्यायालयात भरा असे सांगितले नाही असे खोटे सांगत आहे.

२५. हे म्हणणे खरे नाही की, वादींना शेतजमिन खरेदी दिली असुन तरी देखील सदरचे शेत माझे आहे असे दाखवुन मी भूसंपादनाची रक्कम घेतलेली आहे आणि त्या

आधारे मी शेतजमिनीचा मालक आहे असे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील मजकूर सांगितलेला नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2026.02.21 17:22:47 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–२०.०२.२०२६. दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.